धडा पाठ 15

राधाबाई साक्षर होतात

सुमन : अगं सीमा, ही कामांची यादी कोणासाठी ठेवली आहेस? तुझे यजमान करतात हे सगळं?

सीमा : झालं! हे आणि काम? अगं ही यादी राधाबाईसाठी आहे.

सुमन : त्या कधी वाचायला शिकल्या? त्या तर अंगठे बहाद्दर होत्या ना?

सीमा : अगं, आमच्या श्रीराम आणि उर्मिलाचं काम आहे ते!

सुमन : म्हणजे?

सीमा : अगं मध्यंतरी सासूबाईंना बरं नव्हतं आणि मला नेमकं त्याच दिवसात ऑफिसचं फार काम होतं, बाहेरगावी दौराही होता. म्हणून, मी राधाबाईंना आमच्याकडेच राहायला सांगितलं.

सुमन : बरं बाई, राहिल्या त्या?

सीमा : अगं तो आहे एकटा जीव सदाशिव. तसंच मुलांवर त्यांचा फार जीव! मुलांनाही त्यांचा फार लळा लागला आहे. त्याच तीन-चार महिन्यांत मुलांनी वाचायला शिकवलं त्यांना.

सुमन : मुलांनी?

सीमा : अगं, त्यावेळी सगळीकडे "एकाला तरी साक्षर करा" या मोहिमेचं वारं होतं ना! त्यामुळे मुलांनी राधाबाईंना शिकवायचं मनावर घेतलं.

सुमन : पण फक्त मुलांनी कसं शिकवलं?

राधाबाई साक्षर होती है

सुमन : अरे सीमा, यह कामों की सूची किस के लिए रखी है? क्या तुम्हारे पति यह सब करते हैं?

सीमा : फिर तो हो चुका। मेरे पति और काम? अरे यह सूची तो राधाबाई के लिए है।

सुमन : उसने पढ़ना कब सीख लिया? वह तो अंगूठा छाप थी न?

सीमा : अरे, यह हमारे श्रीराम और उर्मिला का काम है।

सुमन : मतलब?

सीमा : पिछले दिनों सासूजी की तबीयत ठीक नहीं थी। उन्हीं दिनो मुझे ऑफिस का बहुत काम था। बाहर का दौरा भी था। इसलिए मैंने राधाबाई से अपने यहाँ ही रहने के लिए कहा।

सुमन : अच्छा! रही वह?

सीमा : अरे वह तो है अकेली जान! और फिर बच्चों पर भी वह जान छिडकती (है)। बच्चे भी उससे खूब हिल गए हैं। उन्हीं तीन चार महीनों में बच्चों ने उन्हें पढ़ना सिखाया।

सुमन : बच्चों ने?

सीमा : हाँ। उन दिनों "हर एक पढ़ाए एक" की हवा जोरों पर थी न। इसीलिए बच्चों ने राधाबाई को पढ़ाने की मन में ठान ली।

सुमन : पर सिर्फ बच्चों ने कैसे सिखाया?

सीमा : अगं, सासुबाईंनीही त्यात रस घेतला. पडल्या-पडल्या मदत केली. मुलांच्या शिक्षकांनीही त्यांना मार्गदर्शन केलं.

सुमन : आणि खर्च?

सीमा : मुलांनी जुन्या वह्यांचे पाठकोरे कागद शिवून वह्या केल्या. माळ्यावरून जुनी पुस्तकं, पाट्या शोधून काढल्या.

सुमन : म्हणजे तुला कल्पनाही नव्हती?

सीमा: नाही गं! मुलांचं, सासूबाईचं आणि राधाबाईंचे गुपित होतं ते. मी एक दिवस राधाबाईना वर्तमानपत्र वाचताना पाहिलं आणि मला धक्काच बसला. मी विचारलं तेव्हा त्यांनी लाजत लाजत मला सगळं सांगितलं.

सुमन : म्हणजे 'इच्छा तिथे मार्ग' हे त्यांनी सिद्ध केलं तर!

सीमा : हो ना! आणि माझंही काम सुलभ झालं. आता सगळी कामं राधाबाईच करतात. मी फक्त पैसे आणि यादी टेबलावर ठेवते. सासूबाईंचं औषध पाणी, बँकेची कामं, पोस्टाची कामं राधाबाईच करतात. महिन्याच्या खरेदीचाही नीट हिशोब ठेवतात. म्हणतात ना, 'आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन।

सीमा : सासूजी ने भी इस में रूचि ली। पड़े पड़े ही उन्हों ने बच्चों की मदद की। बच्चों के शिक्षकों ने भी उनका मार्गदर्शन किया।

सुमन : और खर्चा?

सीमा : बच्चों ने पुरानी कॉपीयों के कोरे सिलकर कॉपीयाँ तैयार कीं। ऊपरी पर से पुस्तकें और स्लेट ढूँढ निकाली।

सुमन : यानि कि तुम्हें इसकी कल्पना भी नहीं थी?

सीमा : नहीं थी। यह तो बच्चों, सासूजी और राधाबाई का गुप्त रहस्य था। मैंने एक दिन राधाबाई को समाचारपत्र पढ़ते देखा और मै दंग रह गई। जब मैंने पूछा तो उन्हों ने यह सब शर्माते-शर्माते बताया।

सुमन : यानि कि उन्हों ने 'जहाँ चाह वहाँ राह' कहावत को चरितार्थ कर दिखाया।

सीमा : हाँ तो! और (इससे) मेरा भी काम सरल हो गया। अब सभी काम राधाबाई ही करती हैं। मैं केवल (काम की) सूची और पैसा मेज़ पर रखती हूँ। सासूजी को दवाई देना, बैंकका काम, पोस्ट ऑफिस के काम राधाबाई ही करतीं हैं। महिने कि खरीदारी का भी ठीक से हिसाब रखती है। कहते हैं न कि 'अंधा मांगे एक आँख, भगवान देता है दो'।

शब्दार्थ

साक्षर	साक्षर
काम	काम
यजमान	पति
वाचणे	पढ़ना
शिकणे	सीखना
अंगठे बहाद्दर	अँगूठा छाप

बरे नव्हते	तबीयत ठीक नही थी
नेमके त्या दिवशी	ठीक उसी दिन
दौरा	दौरा
राहणे	रहना
एकटा जीव सदाशिव	अकेली जान
लळा लागणे	से हिल जाना
मोहीम	अभियान
मनावर घेतले	करने की ठान ली
रस घेणे	रुचि लेना
पडल्या पडल्या	पड़े-पड़े
मार्गदर्शन	मार्गदर्शन
जुनी वही	पुरानी कापी
पाठकोरे कागद	एक तरफ कोरा कागज
माळा	ऊपरी
शोधून काढणे	खोज निकालना
कल्पनाही नसणे	कल्पना भी न होना
गुपित	गुप्त बात, राज़
धक्का बसणे	दंग रह जाना
लाजत लाजत	शरमाते हुए
इच्छा	इच्छा
मार्ग	राह
सिद्ध करणे	कर दिखाना
सुलभ	आसान
हिशेब ठेवणे	हिसाब रखना
आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन	अंधा माँगे एक आँख भगवान दे दो

अभ्यास

I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर दीजिए।

1) राधाबाईंना कोणी शिकविले?
2) राधाबाई किती दिवसात साक्षर झाल्या?
3) राधाबाई शिकल्या त्यावेळी कोणती मोहिम सुरू होती?
4) मुलांनी राधाबाईंच्या शिक्षणाचा खर्च कसा भागविला?
5) राधाबाई साक्षर झाल्याचे सीमाला केव्हा व कसे समजले?
6) हल्ली राधाबाई कोणकोणती कामे करतात?
7) या पाठात आलेले वाक्प्रचार व म्हणी सांगून त्यांचे अर्थ सांगा.

II उदाहरण के अनुसार वाक्य बनाइए।

1. *उदाहरण:* सुधा येते. सुधा आली.
   1) मी येतो.
   2) मी जाते.
   3) आम्ही बसतो.
   4) तू जेवतेस.
   5) तू खळतोस.
   6) तुम्ही वाचता.
   7) रामू बसतो.
   8) प्रिया पडते.
   9) रामभाऊ येतात.
   10) आपण खेळतो.

III उदाहरण के अनुसार वाक्यों का परिवर्तन कीजिए।

1. *उदाहरण:* सुधा आंबा खाते. सुधाने आंबा खाल्ला.
   1) आई चहा करते.
   2) उमेश वही आणतो.
   3) उमेश पुस्तक वाचतो.
   4) प्रिया पेन शोधते.
   5) बाबा पेपर वाचतात.
   6) त्या पानं आणतात.

2. *उदाहरण:* तुम्ही पेरु खाता. तुम्ही पेरु खाल्ला.
   1) मी फुलं आणते.
   2) मी गूळ आणतो.
   3) आपण चिंचा खातो.

3. *उदाहरण:* शांताचा पाय दुखतो. शांताचा पाय दुखला.
   1) रामभाऊंचा पाय मुरगळतो.
   2) बाळाला ताप येतो.
   3) शांताला उलटी होते.

IV उदाहरण के अनुसार नीचे दिए गए वाक्यों के निषेधवाचक रूप बनाइए।

उदाहरण: त्याने रक्तचंदनाचा लेप दिला.
त्याने रक्तचंदनाचा लेप दिला नाही.

1) मी काल मंडईत गेलो.
2) मी गावात गेलो.
3) आम्ही सामान आणले.

4) तू आंबा खाल्लास.
5) प्रियाने पुस्तक वाचले.
6) तुम्ही खाली पडलात.
7) तो डॉक्टरकडे गेला.
8) सासूबाई गावाला गेल्या.
9) सुचेता आणि प्रिया भांडल्या.
10) आपण घरी गेलो.

V कोष्ठक में दिए गए क्रिया शब्द के उपयुक्त रूपों का प्रयोग कर अनुच्छेद पूरे कीजिए।

1) मी रोज दुपारी काम ..... . (करणे)
पण आज मी .... (झोपणे), कारण मी कालपासून खूप .... (दमणे) आणि माझं डोकंही .... (दुखणे).
2) मी रोज फुलं ..... (आणणे) पण मी आज .... (अभ्यास करणे) आईने अगोदरच फुलं ..... (आणणे)
3) मी रोज दुपारी ..... (झोप) पण आज मी .... (झोप) कारण मी कालपासून खूप .... (झोप) म्हणून आज मला झोप .... (ये).
4) मी संध्याकाळी रोज ..... (खेळणे) पण आज मी आराम .... (करणे) कारण माझा पाय .... (मुरगळणे).
5) रामू आज गावाला .... (निघणे) कारण त्याच्या वडिलांनी त्याला .... (बोलावणे). मागच्या महिन्यातच तो गावाहून इथे .... (येणे).

VI बायीं ओर दिए गए वाक्यांशों के साथ दाहिनी ओर दिए गए वाक्यांशों को ठीक प्रकार से मिलान कर वाक्य बनाइए।

तू घरी	वाचले.
तू बागेतून फुले	खाल्ला.
बाबांनी वर्तमानपत्र	मुरगळला.
उमेशने आंबा	आलास.
शांताबाईचा पाय	आणलीस.
सुचेताने खोली	गेल्यात.
त्या मुली बाजारात	केला.
बाळूने अभ्यास	स्वच्छ केली.

VII नीचे दिए गए वाक्य में रेखांकित शब्द के स्थान पर कोष्ठक में दिए गए शब्दों का प्रयोग कर नए वाक्य बनाइए।

सासूबाईंनी मला निरोप पाठवला.
(साडी, फुले, पुस्तकं, तिकिट, डबा, मासे, बांगड्या)

VIII उदाहरण के अनुसार नीचे दिए गए वाक्यों का परिवर्तन कीजिए।

उदाहरण: मी राधाबाईला यादी देते.
मी राधाबाईला यादी दिली.

1) तू राधाबाईला लिहायला शिकवतेस.
2) तू मित्राला खाऊ देतोस.
3) आम्ही मित्राला पत्र लिहितो.
4) तुम्ही अनिताला साडी देता.
5) तू अमिताला गाणं शिकवतेस.
6) उमेश प्रकाशला सिनेमा दाखवतो.
7) प्रिया बाळाला नवीन कपडे घालते.
8) पिल्लांची आई पिल्लांसाठी अळ्या आणते.
9) राधाबाई मुलांना जेवण वाढतात.
10) ते तुम्हाला पुस्तक देतात.

IX उदाहरण के अनुसार नीचे दिए गए वाक्यों का परिवर्तन कीजिए।

उदाहरण: मीना आंबा खात नाही.
मीनाने आंबा खाल्ला नाही.

1) उमेशला चहा आवडत नाही.
2) विद्यार्थी अभ्यास करत नाहीत.
3) आम्ही रेडिओ ऐकत नाही.
4) मी सिनेमा पहात नाही.
5) आपण काम करत नाही.
6) तू भाजी आणत नाहीस.
7) प्रकाश शाळेत येत नाही.
8) उमा फुलं तोडत नाही.

X कोष्ठक में दिए गए सूचना के अनुसार वाक्यों का परिवर्तन कीजिए।

1) आजोबा लाडू खातात. (भूतकाळ)
2) झाडांना रंगीत फुले येतील. (भूतकाळ)
3) आईने चहा केला. (वर्तमान)
4) मुलांनी केळी खाल्ली. (भविष्यकाळ)
5) उर्मिला कविता वाचते. (भूतकाळ)
6) आम्ही पत्र लिहिले. (वर्तमान)
7) तुम्ही बाजारात जाता. (भूतकाळ)

8) आपण फिरायला जाऊ. (भूतकाळ)

XI उदाहरण के अनुसार नीचे दिए गए वाक्यों का परिवर्तन कीजिए।

उदाहरण: घरात पाय टाकताच रेडिओ सुरू!
घरात पाय टाकल्या टाकल्या रेडिओ सुरू!

1) शोधायला लागताच घर कसं मिळेल?
2) संध्याकाळ होताच प्रकाश अभ्यास करतो.
3) रंगमंदिरात पाऊल टाकताच नाटक सुरू झाले.
4) पाहताच रमेशाला मुलगी आवडली.
5) मी आंबा खाली पडताच उचलला.

XII नीचे दिए गए प्रत्येक वाक्यों में प्रयुक्त द्वित्व का प्रयोग कर तीन-तीन वाक्य और बनाइए।

1) पडल्या पडल्या सासूबाईंनी मुलांना मदत केली.
2) बसल्या बसल्या राधाबाईंनी तांदूळ निवडले.
3) बससाठी थांबल्या थांबल्या मी स्वेटर विणला.
4) झोपल्या झोपल्या तो घोरत होता.
5) उभं राहिल्या राहिल्या तिने भाजी चिरून टाकली.

XIII उदाहरण के अनुसार कोष्ठक में दिए गए शब्दों में से उपयुक्त शब्दों का प्रयोग कर वाक्य पूरे कीजीए।

उदाहरण: शांताबाईचा पाय ..... . (दुखत, दुखणे, दुखला)
शांताबाईचा पाय दुखला.

1) मी बाजारात ..... . (गेला, गेले, गेलांत)
2) मी शाळेत ..... . (आला, आलो, आलात)
3) तू रक्तचंदनाचा लेप ..... . (दिली, दिलास, दिलो)
4) तू रात्री ..... . (झोपलो, झोपलास, झोपलात)
5) तुम्ही दोघी डॉक्टरकडे ..... . (गेला, गेल्यात, गेले)
6) आम्ही दोघी बहिणी ..... . (भांडले, भांडलो, भांडलात)
7) सालीवर सुधाताईंचा पाय ..... . (पडले, पडलो, पडला)
8) उमेश त्याच्या मित्राकडे ..... . (जेवला, जेवलात, जेवले)
9) प्रिया बाहुलीशी ..... . (खेळलो, खेळली, खेळलात)
10) आपण जिना ..... . (उतरले, उतरल्या, उतरलो)

XIV नीचे दिए गए संवाद पूरे कीजिए।

मोहन : आई, बघ सरकारने काय नारा काढला आहे.

आई : ..... .
मोहन : अग तेच, एकाला तरी साक्षर करा.
आई : ..... .
मोहन : म्हणजे प्रत्येकाने एका तरी व्यक्तीला लिहिणे वाचणे शिकवावे.
आई : ..... .
मोहन : असे केल्याने आपल्या देशातील सर्व व्यक्तीसाक्षर होतील.
आई : ..... .
मोहन : हो तू ठीकच वाचलेस. केरळमधे शंभर टक्के लोक साक्षर आहेत.
आई : ..... .
मोहन : त्यामुळे आपल्या देशाची प्रगती होईल. आपल्या देशात खऱ्या अर्थानं लोकशाही येईल.

पढ़िए और समझिए

निरोप समारंभ

प्रौढसाक्षरता वर्गाच्या शेवटच्या दिवशी फार गंमत झाली. आम्ही आमच्या बाईंना निरोप दिला. रामूने बाईंना भेट देण्यासाठी छान कल्पना सांगितली. आम्ही स्वतः तयार केलेलं एक हस्तलिखित बाईंना भेट दिलं. आम्ही सगळ्यांनी एक एक छोटी गोष्ट लिहिली. कुणी लिहीता न आल्यामुळे झालेल्या फजितीचा प्रसंग लिहिला तर कुणी लिहिता आल्यामुळे झालेल्या फायद्याची गोष्ट लिहिली. कुणी लिहायला वाचायला शिकतानाच्या गंमती लिहिल्या. कुणाचे प्रसंग करुण होते तर कुणाचे विनोदी होते.

शेवटच्या दिवशी आमचे सर्वांचेच डोळे भरून आले. आनंदाश्रूंनी आणि दुःखाश्रूंनीही! खूप जणांनी भाषणंही केली. सर्वात लाजाळू वाटणाऱ्या शांताबाईही छान बोलल्या. त्या म्हणाल्या," या वर्गानं आमचं अपंगत्व घालवलं. आम्हाला कुठेही जाण्याचा व काहीही करण्याचा आत्मविश्वास दिला."

बाईंनी समारोपाचं भाषण फारच सुंदर दिलं. त्या म्हणाल्या, "तुम्ही सगळ्यांनी मला खूप काही दिलंत. मलाही आत्मविश्वास मिळाला, समाधान मिळालं आणि इतके सारे सुशिक्षित नागरिकही मिळाले."

सर्वांनी या दिवसाची आठवण म्हणून रोज वर्तमानपत्र वाचण्याची आणि नीट विचार करून मतदान करण्याची शपथ घेतली.

शब्दार्थ

निरोप	बिदाई संदेश
शेवटचा दिवस	आखरी दिन
गंमत	मज़ाक, मौज-मस्ती
हस्तलिखित	हस्तलिखित
फजिती	फजीहत

विनोदी	मज़ाकिया, विनोदी
डोळे भरुन येणे	आँख भर आना
अश्रू	आँसू
लाजाळू	शर्मिली
अपंगत्व	पंगुता
आत्मविश्वास	आत्मविश्वास
समाधान	समाधान
आठवण	याद, स्मृति
वर्तमानपत्र	अखबार
शपथ	शपथ, कसम

अभ्यास

I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर दीजिए।

1) बाईंना कोणती भेट दिली?
2) मुलांनी कोणकोणत्या विषयावर लिहिले?
3) शांताबाईंनी काय सांगितले?
4) सर्वांनी कोणती शपथ घेतली?
5) आनंदाश्रूच्या विरुद्धार्थी कोणता शब्द वापरतात?

II वार्तालाप और अनुच्छेद के आधार पर वाक्य पूरे कीजिए।

1) मग मी राधाबाईंना ..... राहायला ..... .
2) अग तो आहे ..... जीव ..... .
3) मुलांच्या ..... त्यांना मार्गदर्शन ..... .
4) शेवटच्या दिवशी आमचे ..... डोळे भरून आले ..... आणि ..... ही.
5) मलाही ..... मिळाला ..... मिळालं आणि इतके ..... नागारिकही मिळाले.

III कुछ संज्ञाओं में 'आळू' प्रत्यय लगाकर विशेषण बनाया जाता है। नीचे कुछ शब्द दिए गए हैं। उदाहरण के अनुसार विशेषण बनाइए।

उदाहरण: लाज + आळू = लाजाळू

कृपा, दया, विसर, माया, झोप, पाय, कष्ट

IV मराठी में 'सु' और 'अ' लगने से विलोम शब्द बनते हैं। नीचे दिए गए विलोम शब्दों को पढ़िए और कुछ अन्य शब्द बनाइए।

सुशिक्षित	अशिक्षित
सुविचार	अविचार
सुजाण	अजाण
सज्ञान	अज्ञान

V नीचे कुछ मुहावरे दिए गए हैं और उन से संबंधित वाक्य भी दिए गए है। उपयुक्त मुहावरों को चुनकर वाक्य पूरे कीजिए।

आंघळा मागतो एक डोळा देव देतो दोन, वारे असणे, रस घेणे, एकटा जीव सदाशिव, मनावर घेणे, लळा लागणे

1) राधाबाई अगदी एकट्या आहेत, त्यांना कोणीही नाही. ..... .
2) सगळीकडे निवडणूकीचाच विषय आहे. ..... .
3) मी अभ्यास करण्याचा निश्चय केला आहे. ..... .
4) सासूबाई मुलांच्या खेळात लक्ष घालतात. ..... .
5) मुलांचा कुत्र्यावर फार जीव आहे. ..... .
6) अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त मिळणे. ..... .

VI नीचे दिए गए वाक्यों पर ध्यान दीजिए।

1) झालं! हे आणि काम!
   हे काम करणं शक्यच नाही.
2) झालं! माझा आणि पहिला नंबर!
3) झालं! ती आणि सुंदर!

किसी असंभव बात को व्यक्त करने के लिए उपरोक्तनुसार वाक्य प्रयोग किया जाता है। इसी के समान अन्य वाक्य बनाइए।

VII कोष्ठक में दिए गए शब्दों में से उपयुक्त शब्द चुनकर वाक्य पूरे कीजिए।

1) सीमाने कामाची यादी ..... साठी ठेवली. (सासूबाई, राधाबाई, यजमान)
2) राधाबाईना ..... शिकवले. (सासूबाई, शिक्षक, मुलं)
3) सीमा बाहेरगावी ..... साठी गेली. (लग्न, मीटिंग, दौरा)
4) मुलांवर राधाबाईंचा फार ..... आहे. (राग, जीव)
5) मुलांना ..... मार्गदर्शन केले. (शिक्षक, सासूबाई, वडील)
6) मुलांनी जुन्यावह्या, पाटी, पुस्तक ..... वरून शोधून काढले.
   (कपाट, माळा)

VIII हिंदी में अनुवाद कीजिए और उपयुक्त शीर्षक दीजिए।

साक्षरतेची आणि स्त्रीशिक्षणाची चळवळ यांत महात्मा ज्योतीबा फुले यांचे योगदान फार महत्त्वाचे आहे. ते एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील खूप मोठे समाजसुधारक होते. त्यांचा जन्म १८२७ मध्ये आणि मृत्यू २८ नोव्हेंबर १८९० ला इ ाला. ते पुण्यातील गंजपेठेत राहात असत. त्यांनी समाजातील तळागाळातील लोकांच्या उत्कर्षासाठी आणि स्त्रीशिक्षणासाठी अथक परिश्रम केले. स्त्रिया, अस्पृश्य इ. च्या समस्यांकडे त्यांनी समाजाचे लक्ष वेधले. १८५४ मध्ये पुण्यात त्यांनी फक्त मुलींसाठी शाळा सुरू करून स्त्रियांना शिक्षण द्यायला सुरूवात केली, स्त्रीशिक्षणाचा पाया घातला. त्यासाठी, त्यांनी स्वतःची पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिकविले, शिक्षिका बनविले. आपल्या पत्नीकडून स्त्रीशिक्षणाचे कार्य जोमाने करवून घेतले. महात्मा फुल्यांनी यशवंत नावाच्या अनाथ मुलास दत्तक घेऊन त्यास डॉक्टर बनविले. अस्पृश्यांसाठी स्वतःच्या घरचा पाण्याचा हौद खुला केला. तत्त्वासाठी त्यांनी घरही सोडले. पण तत्त्वाशी तडजोड केली नाही. त्यांनी समाजातील अन्याय, अनिष्ट रूढी-परंपरा, अंधश्रद्धा, अज्ञान इ. वर टीका केली आहे. हे सर्व करताना समाजाने त्यांना खूप त्रास दिला. त्यांचा व सावित्रीबाईंचा छळ केला. जुन्या रूढीवादी लोकांना फुल्यांचे विचार पटले नाहीत. फुल्यांनी समता, स्वातंत्र्य, मानवता आणि विश्वबंधुत्व या जीवन मूल्यांचा स्वीकार व प्रचार करून समाजात जागृती घडविली. अन्यायाविरुद्ध बंड केले. तसेच त्यांनी 'अभंगा' सारखी रचना केली. त्यास ते 'अखंड' म्हणायचे. समाजकार्य करता करता त्यांनी 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड', 'सार्वजनिक सत्यधर्म' इ. ग्रंथही लिहिले. समाजसुधारणेसाठी विचार व्यक्त करून त्याप्रमाणे कार्य करणारे सुधारक होते ते! त्यांच्या विचारांचे सर्वांनी अनुकरण करायला पाहिजे. त्यांचे विचार व कार्य समाजाला मार्गदर्शक ठरेल. सरकारने त्यांच्या पुण्यातील घराचे 'समताभूमी' या नावाने 'राष्ट्रीय स्मारक' केले आहे. महात्मा फुले समाजातील तळागाळातील लोकांसाठी व स्त्रियांसाठी चंदनासारखे झिजले. म्हणूनच लोकांनी त्यांना 'महात्मा' ही उपाधी दिली. त्यांना 'स्त्रीशिक्षणाचा प्रणेता' म्हणणे योग्य आहे.

IX मराठी में अनुवाद कीजिए।

मेरा गाँव पूर्णतः निरक्षर था। गाँव में कोई स्कूल भी नहीं था। बच्चे पड़ोस के गाँव के स्कूल में पढ़ने जाते थे। छुट्टियों में मैं प्रौढ़ों को साक्षर बनाने के अभियान में जुट गया। पहले अपने ही घरके लोगों को पढ़ाने-लिखाने का निश्चय किया। वे तैयार भी हो गए। लेकिन दादा-दादी तैयार नहीं हुए। मैंने उन्हें समझाने का काफी प्रयास किया। आखिर वे तैयार हुए। अपने काम में मुझे सफलता मिली। इसी प्रकार साक्षरता का प्रचार कार्य मैं ने घर से ही शुरु किया।

X प्रौढसाक्षरता के बारे में मराठी में एक अनुच्छेद लिखिए।

टिप्पणियाँ

I नीचे दिए गए वाक्यों के क्रिया रूपों पर ध्यान दीजिए।

1)	मी राधाबाईंना आमच्याकडेच राहायला सांगितलं.	मैंने राधाबाई को अपने यहाँ ही रहने को कहा।
2)	तीन चार महिन्यांत मुलांनी वाचायला शिकवलं त्यांना.	तीन चार महिनों में बच्चोंने उन्हें पढ़ना सिखाया।
3)	सासुबाईंनीही त्यात रस घेतला.	सासूजी ने इस में रुचि ली।
4)	त्यांनी मुलांना मदत केली.	उन्होंने बच्चों की मदद की।
5)	शिक्षकांनीही त्यांना मार्गदर्शन केलं.	शिक्षकों ने भी उनका मार्गदर्शन किया।
6)	मी एक दिवस राधाबाईंना वर्तमानपत्र वाचतांना पाहिलं.	(मैंने एक दिन राधाबाई को समाचारपत्र पढते देखा।)
7)	त्यांनी मला सगळं सांगितलं.	(उन्हों ने मुझे सब कुछ बताया।)

उपर्युक्त वाक्यों में क्रिया के (सकर्मक) भूतकालिक रूपों का प्रयोग किया है।

जब कि हिंदी में सकर्मक क्रिया के भूतकालिक रूप के प्रयोग में कर्ता में 'ने' प्रत्यय लगता है, मराठी में 'नी' प्रत्यय, या 'ने', या 'नं' केवल अन्यपुरुष में लगता है। मी (मैं), तू (तू, तुम), आपण (आप) के साथ नहीं लगता है। इन प्रयोगों में क्रिया कर्म की अनुगामिनी होती है, और क्रियारूप में कर्म के पुरुष, वचन, लिंगानुसार प्रत्यय लगते हैं। 'नी' के स्थानपर 'ने' या 'नं' का भी प्रयोग करते हैं।

ध्यान दें कि मराठी में सामान्य भूतकाल में 'तू' के साथ क्रिया रूप के अन्त में 'स' प्रत्यय लगाया जाता है।

उदाहरण:	तू आंबा खाल्लास.	तुम ने आम खाया।
	तू आंबे खाल्लेस.	तुम ने आम खाए।
	तू पोळी खाल्लीस.	तुम ने रोटी खाई।

II नीचे दिखाए प्रयोगों की ओर ध्यान दीजिए।

सासुबाईंनी रस घेतला.	सासूजी ने रुचि ली।
मुलांनी मदत केली.	बच्चों ने मदद की।
मी राधाबाईंना पाहिले.	मैंने राधाबाई को देखा।

भूतकालिक प्रत्यय लगने से पहिले कुछ क्रियाओं के रूप में परिवर्तन होता है। सामान्यतः प्रयोग में आनेवाली कुछ क्रियाओं के परिवर्तित रूप निम्न प्रकारों के होते हैं।

खा (खाना)	- खाल (खाल्ला - 'खाया')
कर (करना)	- के (केल - 'किया')

धू (धोना) - धुत (धुतला - 'धोया')
घाल (पहनना) - घात (घातला - 'पहना')
घे (लेना) - घेत (घेतला - 'लिया')
दे (देना) - दि (दिला - 'दिया')
बघ (देखना) - बघित (बघितला - 'देखा')
सांग (कहना) - सांगित (सांगितला - 'कहा')
माग (माँगना) - मागित (मागितला - 'माँगा)
पहा (देखना) - पाहि (पाहिला - 'देखा')
वहा (चढ़ाना) - वाहि (वाहिला - 'चढ़ाया')
म्हण (कहना) - म्हणा/म्हट (म्हटलं - 'कहा') (म्हणाला -'कहा')

III कुछ क्रियाओं के कर्ता में 'ने' ऐच्छिक रूप से लगता है। जब 'ने' नहीं लगता है तो क्रिया कर्ता की अनुगामिनी होती है। ने-लगने पर कर्म की अनुगामिनी होती है।

उदाहरण: नेस - पहनना, पी -पीना, म्हण-कहना

म्हणा - तो म्हणाला उसने कहा।
म्हट - त्याने म्हटले उसने कहा।
नेस - तो धोतर नेसला.
त्याने धोतर नेसले. } उसने धोती पहनी।
पी - तो कॉफी प्यायला.
त्याने कॉफी प्यायली. } उसने काफी पी।

'ने' लगने पर 'म्हण' धातु का 'म्हट' हो जाता है।

ध्यान दें - 'पी' धातु के साथ कोई कर्म न होनेपर उसका अर्थ शराब पीना होता है। इस स्थिती में 'ने' नहीं लगता।

IV ऐसी भी कुछ क्रियाएँ हैं जिन में सकर्मक होने पर भी उन के कर्ता में 'ने' नहीं लगता और क्रिया कर्ता के अनुसार होती है।

शीक - सीखना
विसर - भूलना
बोल - बोलना
चुक - चुकना

तो (पु.) सायकल शिकला. उसने(पु.) साइकिल सीखी।
ती (स्त्री.) सायकल शिकली. उसने (स्त्री.) साइकिल सीखी।
तू सायकल शिकलास.
आम्ही सायकल शिकलो. हमने साइकिल सीखी।

V हिंदी के समान ही मराठी में क्रिया रूप को दोबार प्रयुक्त कर कार्य का तत्काल होना सूचित किया जाता हैं।

उदाहरण: तो बसल्या बसल्या खुर्ची मोडली.
(उसके बैठते-बैठते कुर्सी टूट गई।)
तो बसल्या बसल्या घंटा वाजली.
(उसके बैठते-बैठते घंटी बज गई।)

इस रूप का प्रयोग 'बैठे बैठे' इस अर्थ में भी होता है। किंतु इस प्रयोग में आवश्यकतानुसार 'ने' का प्रयोग होता है।

त्याने बसल्याबसल्या एक किलो बर्फी खाल्ली. (उस ने बैठे बैठे एक किलो बरफी खाई।) तिने बसल्या बसल्या सगळे गहू निवडले (उसने बैठे बैठे सारे गेहूँबीने।)